महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-१७२२/प्र.क्र.१२/ फ-१०

E-mail. desk10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८.०१.२०२२

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
वनसंरक्षक (प्रा.) धुळे

**विषय: वनजमीन-जळगाव**
हंड्या-कुंड्या साठवण तलावासाठी ३१.४९ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-17/ NODAL/Dhule/ID-12908 (31)/1570/20-21, दि. १८.११.२०२१

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये हंड्या-कुंड्या साठवण तलावासाठी ३१.४९ हे. वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावातील खालील मुद्यांच्या अनुषंगाने आपले अभिप्राय आवश्यक कागदपत्रांसह शासनास सादर करावेत:-

१) सन २०११ मध्ये सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दु.१८.०७.२०१५ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या त्रूटींची पूर्तता करण्यात आली किंवा कसे? असल्यास त्यावर काय निर्णय झाला व नवीन प्रस्ताव सादर करण्यामागचे कारण काय?

२) प्रस्तावित वनजमीन यावल वन्यजीव अभयारण्यापासून २.५ कि.मी. अंतरावर असल्याचे तसेच अभयारण्याच्या Eco-Sensitive Zone मध्ये असल्याचे प्रस्तावात नमूद आहे. तथापि, प्रस्तावात mitigation measures सुचविलेले नाहीत अथवा प्रस्तुत प्रकरणी राज्य वन्यजीव मंडळ / राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी वन्यजीव मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत भाष्य केलेले नाही.

३) प्रस्तावित क्षेत्र Wildlife Corridor चा भाग आहे किंवा कसे ? सदर क्षेत्राला वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या कलम 38 O i (g) मधील तरतूदी लागू होतात किंवा कसे याबाबत भाष्य केलेले नाही.

४) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेली गट नं. १४८ मधील जमीन ग्रामपंचायत पिंपळगाव गोलाईत व उपवनसंरक्षक, जळगाव वन विभाग यांच्या नावे असल्याचे ७/१२

उता-यावर नमूद आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या सहमतीची कागदपत्रे तपासणे आवश्यक आहे. मात्र नकाशावर पूर्ण गट. नं. १४८ पर्यायी वनीकरणासाठी दर्शविण्यात आला आहे. नकाशावर ग्रामपंचायत व वन विभाग यांची जमीन भिन्न असल्याचे दिसून येत नाही. नकाशातील विसंगती दूर होणे आवश्यक आहे.

५) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीवरील वृक्षांची घनता प्रस्तावात नमूद केलेली नाही. पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेली जमीन खरोखर वनीकरणासाठी योग्य आहे किंवा कसे याची शहानिशा होणे आवश्यक आहे.

६) प्रस्तावासोबत Google नकाशा सादर केलेला नाही.

७) स्थळपाहणी अहवालासोबत स्थळदर्शक छायाचित्रे जोडलेली नाहीत.

(गणेश जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन